आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय क बातमीपत्र - संध्याकाळी ८.०५ वाजता

१ एप्रिल २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- बँकिंग पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चितीची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मुंबईत प्रतिपादन / रिझर्व बँकेच्या ९० व्या स्थापना दिनानिमित्त ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं केलं लोकार्पण

- निवडणुकांच्या काळात काँग्रेसकडून जबरदस्तीने आयकर वसुली करणार नसल्याचं केंद्र सरकारच्या वतीनं सर्वोच्च न्यायालयात निवेदन

- शेअर बाजारात नव्या आर्थिक वर्षाची सुरूवात तेजीनं /दोन्ही निर्देशांकांनी गाठली ऐतिहासिक उंची /सोन्याच्या दरातही मोठी वाढ

- महाराष्ट्र, गुजरात, दक्षिण राजस्थान आणि उत्तर कर्नाटकात १५ दिवसांपेक्षा जास्त काळ उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज वानखेडे स्टेडिअमवर मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांची लढत / मुंबईची खराब सुरुवात

**<><><><><><>**

देशातल्या सर्व क्षेत्रातल्या नागरिकांना, व्यावसायिकांना सोयीनुसार आणि गरजेनुसार बँकिंग करता यावं तसंच बँकिंगच्या पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चितीची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. रिझर्व बँकेच्या ९० व्या स्थापना दिनाच्या निमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डिजिटल व्यवहारांना प्राधान्य देताना रोखे विरहित व्यवहारांमधून होणाऱ्या बदलांकडे लक्ष देण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड प्रधानमंत्री**

सर्वसमावेशक प्रगतीसाठी विभिन्न क्षेत्रांची भविष्यातील गरज ओळखून काम करण्याची आणि अभिनव संकल्पना राबवण्याची शिफारस प्रधानमंत्र्यांनी रिझर्व्ह बँकेला केली. गेल्या १० वर्षात देशातल्या बँकिंग व्यवस्थेत झालेल्या बदलांचा आढावा त्यांनी भाषणात घेतला. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं लोकार्पण झालं. कोरोना काळात रिझर्व्ह बँकेनं उचललेल्या पावलांचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कौतुक केलं. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेला, बँकांना आणि चलनवाढ आटोक्यात आणण्याला फायदा झाल्याचं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्राला बदलत्या काळानुसार सुसंगत करण्यासाठी रिझर्व्ह बँक कार्यरत असल्याचं गव्हर्नर शक्तीकांत दास यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

निवडणुकांच्या काळात काँग्रेसकडून जबरदस्तीने आयकर वसुली करणार नसल्याचं निवेदन केंद्र सरकारच्या वतीनं देशाचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान दिलं. येत्या जुलै महिन्यापर्यंत आयकर विभागाच्या ३ हजार ५०० कोटी रुपयांच्या कर थकबाकीची वसुली केली जाणार नाही असंही त्यांनी निवेदनात म्हटलं आहे. केंद्र सरकारनं न्यायमूर्ती बीव्ही नागरत्ना आणि न्यायमूर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर हे निवेदन दिलं. या याचिकेची पुढची सुनावणी २४ जुलै रोजी होणार आहे.

**<><><><><><>**

महिलांविषयी अवमानकारक उद्गार काढल्याबद्दल आज निवडणूक आयोगानं भाजपा खासदार दिलीप घोष आणि काँग्रेस नेत्या सुप्रिया श्रीनेत यांची कानउघाडणी केली. घोष यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरोधात तर श्रीनेत यांनी भाजपाच्या लोकसभा उमेदवार कंगना रानौत

यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. या दोघांनी वैयक्तिक टीका केली असून त्यामुळे आचारसंहितेतल्या तरतुदीचं उल्लंघन झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

या अनुषंगानं भाजपाध्यक्ष जगतप्रकाश नड्डा आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना केंद्रीय निवडणूक आयोगानं नोटीस बजावली आहे. लोकसभा निवडणूक काळात दोन्ही पक्षांमधल्या नेत्यांच्या विधानाबाबत काळजी घ्यावी आणि दक्षता राखावी यासाठी ही नोटीस बजावली आहे. दोन्ही पक्षाच्या अध्यक्षांनी आपापल्या नेत्यांना आदर्श आचारसंहितेच्या नियमांचं उल्लंघन करण्यापासून रोखावं, असं आयोगानं बजावलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात आजपासून नवीन वीज दर लागू झाले आहेत. इंधन अधिभार जोडल्यावर सुमारे १० टक्के दरवाढीचा बोजा महावितरणच्या ग्राहकांवर पडणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्च २०२३ च्या आदेशानुसार ही दरवाढ झाली आहे. दोन वर्षांसाठी दोन टप्प्यांत वीज दरवाढ होईल. घरगुती संवर्गातील सिंगल फेजसाठी पूर्वी ११६ रुपये लागायचे. आता १२८ रुपये लागतील. थ्री फेजसाठी पूर्वीच्या ३८५ रुपयांऐवजी ४२५ रुपये लागणार आहेत. वाणिज्यिक ग्राहकांना पूर्वीच्या ४७० रुपयांऐवजी ५१७ रुपये द्यावे लागतील.

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं आजपासून आपल्यासाठी

सुरु केला आहे. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. उद्याच्या भागात आपण रामटेक लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज नव्या आर्थिक वर्षाची सुरूवात तेजीत झाली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ३६३ अंकांची वाढ नोंदवत ७४ हजार १५ अंकांवर, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १३५ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ४६२ अंकांवर बंद झाला. दिवसभरात सेन्सेक्सनं एकदा ७४ हजार २५५ अंकापर्यंतची ऐतिहासिक उंची गाठली, तर निफ्टीही २२ हजार ५३० अंकाच्या विक्रमी उंचीवर पोचला होता.

<><><><><>

नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सोनं तोळ्यामागे चौदाशे रुपयांनी महाग झालं. २४ कॅरेट सोन्याचे दर आज तोळ्यामागे ६८ हजार ६६० रुपयांवर पोहोचले होते. २२ कॅरेट सोनं ६७ हजार रुपयांवर गेलं होतं. गुड फ्रायडेमुळं ३ दिवस बंद असलेला कमोडिटी बाजार सकाळी तेजीतच खुला झाला. ऑस्ट्रेलिया आणि हाँगकाँग बाजारातल्या तेजीमुळं सोनं प्रति औंस २ हजार २७८ डॉलरपर्यंत पोहोचलं होतं. यामुळं देशातल्या बाजारात सोन्याचे भाव वाढल्याची माहिती कमोडिटी बाजाराचे तज्ञ अमित मोडक यांनी दिली.

<><><><><>

या उन्हाळ्यात देशात तापमान सामान्यपेक्षा अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. महाराष्ट्र, गुजरात, दक्षिण राजस्थान आणि उत्तर कर्नाटकात १५ दिवसांपेक्षा जास्त काळ उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचं भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्यूंजय महापात्रा यांनी आज

नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. जम्मू-काश्मिर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि ईशान्येतली राज्य वगळता इतर ठिकाणी एप्रिलपासून जूनपर्यंत ही उष्णतेची लाट येण्याचा अंदाज असल्याचं ते म्हणाले. राज्यात प्रामुख्यानं विदर्भ आणि मराठवाडा वगळता इतर ठिकाणी २ आठवड्यांपेक्षा जास्त काळ उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. इतर ठिकाणी हे प्रमाण ८-१० दिवसांपर्यंत जाऊ शकतं, अशी माहिती त्यांनी दिली. उष्णतेच्या लाटेचा परिणाम जाणवू नये म्हणून ज्येष्ठ नागरिक, लहान मुलं, आजारी व्यक्ती यांनी खबरदारी घ्यावी असा सल्ला हवामान विभागानं दिला आहे.

<><><><><><>

तेल विपणन कंपन्यांनी १९ किलो व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किंमती कमी केल्या आहेत. यामुळे सिलिंडर ३० ते ३२ रुपयांनी स्वस्त झाले आहेत. आता मुंबईत एका व्यावसायिक सिलिंडरची किंमत एक हजार ७१७ रुपये इतकी झाली आहे.

<><><><><><>

टोकियो ऑलिंपिक मध्ये रौप्य पदक पटकावणाऱ्या मीराबाई चानू या भारोत्तोलक महिला खेळाडूची २०२४ च्या पॅरीस ऑलिंपिकसाठीही निवड होणार आहे. या क्रीडा प्रकारासाठी निवड होणारी ती एकमेव महिला खेळाडू ठरणार आहे. जायबंदी झाल्यानं गेले ६ महिने मीराबाईला या खेळात सहभागी होता आलं नव्हतं. पण या दुखण्यावर मात करत थायलंड मधल्या कुकेत इथं सुरु असलेल्या विश्वचषक स्पर्धेत १८४ किलो भारोत्तोलन करून मीराबाईनं आज पात्रता फेरी गाठली. तिच्या निवडीबाबतची अधिकृत घोषणा ही विश्व चषक स्पर्धा आटोपल्यानंतर केली जाणार आहे. २०१७ दरम्यान जागतिक पातळीवरची

जगज्जेती ठरलेल्या मीराबाईला ४९ किलो वजनी गटातलं ऑलिंपिक पात्रता फेरीचं दुसरं मानांकन लाभलं आहे.

**<><><><><><>**

मार्च २०२४ मधे जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा करातून एक लाख ७८ हजार कोटी रूपये इतका स्थूल महसूल गोळा झाला. आतापर्यंतचा हा दुसऱ्या क्रमांकाचा मोठा महसूल आहे. गेल्या मार्चच्या तुलनेत त्यात ११ टक्क्याहून अधिक वाढ झाली आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयानं ही माहिती दिली आहे.

**<><><><><><>**

ज्ञानवापी मशिद प्रवेश प्रकरणात, हिंदूनी दक्षिणेकडून प्रवेश करून प्रार्थना करायला परवानगी देणाऱ्या वाराणशी जिल्हा न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठानं दोन्ही पक्षकारांना या परिसरातील परिस्थिती पूर्वी दिलेल्या आदेशांप्रमाणेच ठेवण्याचे आदेश दिले. हिंदू दक्षिणेकडून प्रवेश करून तळघरात प्रार्थना करतील, तर मुस्लिम उत्तरेकडून प्रार्थना करतील असं या आदेशांमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सचा आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना सुरू आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ७ षटकात ४ बाद ५९ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><><>//**